खडक पोलीस स्टेशन, पुणे शहर.
दिनांक : ३०/०८/२०१८.

# प्रेसनोट

**जबरी चोरी व विनयभंग या गुन्हयातील ३ महिण्या पासून पाहिजे असलेल्या सराईत गुंड नामे- आरबाज ऊर्फ बबन इकबाल शेख वय २० रा २८६ भवानी पेठ चुडामण तालीम चौक पुणे यास खडक पोलीस स्टेशन कडून जेरबंद**

---

दि.२७/०८/२०१८ रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस ठाणे, पुणे यांचे मार्गदर्शानाखाली तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी खडक पोलीस स्टेशन चे अभिलेखावरील गुन्हेगार चेक करित असताना खडक पोलीस स्टेशन कडील विनयभंग व समर्थ पोलीस स्टेशन कडील जबरी चोरी यासारख्या गंभीर गुन्हयातील ३ महिण्या पासून पाहिजे असलेल्या सराईत गुंड तसेच पुणे जिल्ह्यातुन दोन वर्षाकरीता तडीपार केलेला आरोपी नामे- आरबाज ऊर्फ बबन इकबाल शेख वय २० रा. २८६ भवानी पेठ चुडामण तालीम चौक पुणे हा चुडामण तालीम चौक येथे येणार असल्या बाबत माहिती खडक पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई आशिष चव्हाण व प्रमोद नेवसे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत मिळाली. मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडक पोलीस स्टेशन मार्गदर्शनाने खडक पोलीस स्टेशनचे तपास पथकातील पोलीस कर्मचारी यांनी सापळा लावुन आरोपीस सिताफीने आपआपसामध्ये इशारा करुन, सोबतचे स्टाफचे मदतीने घेराव घालून त्यास दिनांक- २७/०८/२०१८ रोजी २२.०० वा. जागीच पकडुन जेरबंद केले.

सदर आरोपी हा खडक पोलीस स्टेशन कडील रेकॉर्ड वरील गुन्हेगार असून त्याचेवर खडक पोलीस स्टेशन येथे गर्दी जमवून मारामारी करणे,लोंकाना धमकी देणे, खंडणीची मागणी करणे,घातक शस्त्र जवळ बाळगुन लोकांच्या मनात दहशत निर्माण करणे व धमकावणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून त्यास खडक पोलीस स्टेशन कडून सन २०१७ साली २ वर्षा करिता तडीपार करण्यात आले होते. तडीपार कालावधीत ही नमुद आरोपी यांचेवर खडक पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजि.नं- ४९/२०१८ भा.द.वि कलम ५०६(२),५०४ भारताचा हत्यार कायदा कलम ४(२५) व गुन्हा रजि.नं- १८६/२०१८ भा.द.वि कलम ३५४(ब),५०४,५०६(२),५०९ प्रमाणे २ गुन्हे व समर्थ पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं- ५०/२०१८ भा.द.वि कलम ३९२, प्रमोण १ गुन्हा दाखल असून गेल्या ३ महिण्यापासून तो नमुद गुन्हयात पाहिजे आरोपी होता.

सदर कारवाई मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ पुणे शहर, व फरासखाना विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. प्रदिप आफळे, यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विजयकुमार शिंदे, सहा पोलीस निरीक्षक वैभव पवार, पोलीस कार्मचारी विनोंद जाधव, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, रवि लोंखडे, व संदीप पाटील यांनी भाग घेवुन नमुद आरोपीस जेरबंद केले.